!! श्री !!

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

शिवसेना

जा.क्र. : खा.का.प्र.प ३२०/२२/०५/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करुन जनभावनांचा आदर करा :
शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची पाणी पुरवठा अधिकाऱ्यांना सुचना

संभाजीनगर : (ता.२२) दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत आहे, जनतेस किमान आवश्यक तितके पाणी पुरवण्याचे काम महापालिका व वॉटर युटिलीटी अधिकाऱ्यांचे आहे. गेल्या ७ ते ८ दिवसापासुन शहरातील पाणी पुरवठ्याच्या तक्रारीचा निपटारा करुन नागरिकांना सहकार्य करण्याची सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली.

शहराचा पाणीपुरवठा त्वरीत सुरळीत करुन जनभावनांचा आदर करण्याचे आदर करण्याचे आदेश त्यांनी दिले. सुभेदारी विश्रामगृह येथे झालेल्या शहर पाणीपुरवठा संदर्भिय बैठकिला महापौर त्र्यंबक तुपे, सभागृहनेता राजेंद्र जंजाळ, उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक नंदकुमार घोडेले, पाणीपुरवठा अभियंता हेमंत कोल्हे, वॉटर युटिलिटीचे प्रणय मजुमदार, शिवांगी, घोष यांची उपस्थिती होती.

नगरसेवकांना सकाळी उठल्यापासुन ते रात्री उशिरापर्यंत फक्त पाण्याच्या तक्रारी येत आहे. त्यांना हवे तिथे टँकर सुविधा, पाईपलाईन नवीन नळ, यासारख्या गोष्टीची त्वरीत सेवा द्या. टँकरची संख्या वाढवून महापालिकेच्या शाळा, रुग्णालये, सार्वजनिक ठिकाणी मुबलक पाणी पुरेल अशी व्यवस्था करा. नागरिकांना योग्य सहकार्य करुन सर्वांना पाण्याचे समान वाटप करण्यासाठी मनपा पाणीपुरवठा व वॉटर युटिलिटी यांनी समन्वय साधुन जनसेवा अखंडित सुरु ठेवावी. महापौर त्र्यंबक तुपे यांनी ही जनतेचे प्रश्न त्वरीत सोडविण्याची सुचना केली.

संबंधित अधिकाऱ्यांनी यांनी ही गेल्या आठवड्यात जायकवाडी येथे पंपाजवळ गाळ व घाण साचल्याने पाणी प्रवाह कमी होता. फारोळा जलशुध्दीकरण केंद्रावर ही वीजेची लोडशेंडिग व वीजेचा कमी जास्त प्रवाह झाला होता. छोट्या-मोठ्या समस्या नियंत्रित आल्यापासुन लवकरच शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन बैठकित दिले.

या बैठकित नगरसेवक मकरंद कुलकर्णी, माजी नगरसेवक आनंद तांदुळवाडीकर, किशोर नागरे, उपशहरप्रमुख हिरा सलामपुरे, चंद्रकांत इंगळे, सुरेश पवार, अभियंता एस. एस. शिंदे, मु.जी. शिरसाट, काकडे, शिक्षक सेनेचे दत्ता पवार, गौतम खरात, संतोष जाटवे, अशोक पटवर्धन, पंढरीनाथ गोंडे पाटील यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

प्रसिध्दी प्रमुख

फोटो मेल केला आहे.

गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400